## स्वच्छता हि सेवा 2024 अभियान

# ग्रामपंचायतींनी स्वच्छता निरंतर करावी

## कार्तिकेयन एस. : 'स्वच्छता ही सेवा' मोहीम दोन ऑक्टोबरपर्यंत

### एक लाख कापडी पिशव्यांचे वाटप होणार

जिल्ह्यात ग्रामपंचायतींच्या माध्यमातून १ लाख कापडी पिशव्या वाटप केल्या जाणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी प्लास्टिकच्या विटा तयार करणे, यासह विविध स्पर्धांचे आयोजन केले जाणार असल्याचे जिल्हा समन्वयक तथा प्रकल्प संचालक माधुरी परीट यांनी सांगितले.



उजळाईवाडी : येथे स्वच्छता करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. आदी.

कोल्हापूर, ता. १९ : स्वच्छता ही सेवा श्रमदान पंधरवडा म्हणून साजरा केला जाणार आहे. हे श्रमदान किंवा स्वच्छता जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत, ग्रामस्थांनी निरंतर करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन. एस. यांनी आज केले. उजळाईवाडी येथे स्वच्छता मोहिमेच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते.

कार्तिकेयन एस. म्हणाले, 'जिल्ह्यात २ ऑक्टोबरपर्यंत 'स्वच्छता सेवा मोहीम' राबवली जाणार आहे. ही लोक चळवळ निर्माण झाली पाहिजे. ग्रामपंचायत पातळीवर विविध उपक्रम राबवावेत. गावामध्ये एक दिवस ग्रामस्वच्छतेसाठी दिला पाहिजे. गावामध्ये कायम साचलेला कचरा असणारी ठिकाणे निश्चित करून वारंवार स्वच्छ करावीत. दरम्यान, उजळाईवाडीतून स्वच्छतेची प्रभात फेरी काढली. त्यानंतर स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली. गावची स्वच्छता करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेच्या परिसरामध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

उजळाईवाडीचे सरपंच उत्तम अंबवडे, गटविकास अधिकारी विजय यादव, ग्रामविकास अधिकारी सरदार दिंडे उपस्थित होते.

---

तरुण भारत संवाद — कोल्हापूर पान ५

# 'स्वच्छता ही सेवा' मोहीम प्रभावीपणे राबवा

## जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचे आवाहन : स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता संकल्पना : जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

प्रतिनिधी कोल्हापूर



कोल्हापूर : 'स्वच्छता ही सेवा २०२४' या मोहिमेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्यासह अधिकारी.

[illegible]

---

## कचरा संकलनासाठी ई घंटा गाडी वाटप कार्यक्रम

पुण्यनगरी

# ई-घंटागाड्यांचे पालकमंत्री मुश्रीफ यांच्या हस्ते वितरण

## स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत ग्रामपंचायती करणार संकलन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी गावस्तरावर नॅडेफ, गांडूळ खत, कचरा वर्गीकरण शेड, तालुका स्तरावर प्लास्टिक प्रक्रिया केंद्र या प्रकल्प यंत्रणा उभारल्या आहेत. यामध्ये प्रत्येक घरातून तयार होणार घनकचरा हा वर्गीकरण करुन, त्याचे खतात रुपांतर होण्यासाठी कचऱ्याचे प्रकल्पापर्यंत वाहतूक करण्यासाठी राज्य शासनाच्या पाणी व स्वच्छता विभागाकडून ई- घंटागाड्या पुरवण्यात येत आहेत.



कोल्हापूर जिल्ह्यातील स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ७० टक्के निधी उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायतींनी मागणी नोंदवल्यानुसार जिल्हयातील ४६ ई-घंटा गाड्यांचा पुरवठा राज्यस्तरावरुन करण्यात आले. या गाड्यांचे वितरण पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी अमोल येडगे, प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., जिल्हा समन्वयक तथा प्रकल्प संचालक माधुरी परीट, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अरुण जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. गावातील कचरा संकलन करताना कुटुंब स्तरावरच ओला व सुका असा वर्गीकरण करावा, अशा सूचना उपस्थित सरपंच व ग्रामसेवक यांना देण्यात आल्या.

Kolhapur Edition

Sep 24, 2024 Page No. 04

Powered by: erelego.com

---

# घनकचरा संकलनासाठी ई-घंटागाड्यांचे वितरण

## मिशन ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत आरळे, थेरगाव ग्रामपंचायतींना गाड्या प्रदान

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर : पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते आरळे (ता. पन्हाळा) व थेरगाव (ता. शाहूवाडी) ग्रामपंचायतचे सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे घंटागाड्यांच्या किल्ल्या देण्यात आल्या. शेजारी जिल्हाधिकारी अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस.

कोल्हापूर, ता. २३ : जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागातर्फे स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घनकचरा संकलनासाठी ई-घंटागाड्यांचे आज वितरण झाले. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते आरळे (ता. पन्हाळा) व थेरगाव (ता. शाहूवाडी) ग्रामपंचायतचे सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे घंटागाड्या देण्यात आल्या.

गावस्तरावर नॅडेफ, गांडूळ खत, कचरा वर्गीकरण शेड, तालुकास्तरावर प्लास्टिक प्रक्रिया केंद्र प्रकल्प यंत्रणा उभारल्या आहेत. प्रकल्पात प्रत्येक घरातून तयार होणारा घनकचरा वर्गीकरण करून त्याचे खतात रूपांतर करण्यात येणार आहे. त्यासाठी कचरा प्रकल्पापर्यंत वाहतूक करण्यासाठी राज्य शासनाच्या ई-घंटागाड्या पुरविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील स्वच्छ भारत अभियानअंतर्गत ७० निधी उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार ४६ ई-घंटागाड्यांचा पुरवठा राज्यस्तरावरून करण्यात येत आहे.

पैकी शासनाकडून प्राप्त प्रतिनिधिक स्वरूपातील दोन ई-टागाड्या देण्यात आल्या.

यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., प्रकल्प संचालक माधुरी परीट, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अरुण जाधव उपस्थित होते.

